क्रमांक : १४३७६/क-१,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २१ सप्टेंबर, २०२१.

**संदर्भ** :- १) या सचिवालयाचे ज्ञापन क्रमांक १४७१०/क-१, दिनांक २३ ऑक्टोबर, २०२०.
२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६१९६/क-१, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२०.

:: **परिपत्रक** ::

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र विधानमंडळाच्या ग्रंथालय कक्षात उपलब्ध असलेल्या कार्यवृत्तांचे डिजिटलायझेशन करण्याकरिता विधानमंडळ सचिवालयाची प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) (PIC) गठीत करण्यात आलेली होती.

उक्त समितीने विधानमंडळ सचिवालयातील विविध कक्षांमध्ये असणारी माहिती, महत्त्वाच्या नस्त्या व संदर्भासाठी आवश्यक असणारे साहित्य यांचाही डिजिटलायझेशन प्रकल्पात समावेश करण्यात यावा जेणेकरुन प्रत्येक कक्षाला त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती डिजिटलरुपात जतन करता येईल व आवश्यकतेनुसार त्या कक्षास व या सचिवालयातील इतर कक्षासही सहजतेने उपलब्ध होऊ शकेल, याप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व कक्षांना त्यांच्याकडे असणारी माहिती, महत्वाच्या नस्त्या व संदर्भासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची सविस्तर माहिती व अंदाजे पृष्ठ संख्या याची यादी तयार करुन डिजिटलायझेशनच्या माध्यमातून प्रत्येक कक्षाला कुठल्या प्रकारची माहिती कशाप्रकारे मिळणे अपेक्षित आहे. याबाबतची माहिती उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये 'प्रकल्प अंमलबजावणी समिती' यांच्याकडे पाठविण्याबाबत कळविले होते.

तथापि, सर्व कक्षांनी उपरोक्त समितीकडे त्यांचेकडील नस्त्या व कागदपत्रे यांची सांख्यिकीय माहिती सादर केली. परंतु, कक्षांना डिजिटलायझेशन प्रकल्पाच्या माध्यमातून त्यांच्या कक्षांच्या संबंधीत माहिती कशाप्रकारे व कुठल्या स्वरुपात अपेक्षित आहे, याबाबत कळविले नाही.

..२/-

प्रकल्प अंमलबजावणी समितीने M/s Deloitte या सल्लागार संस्थेची विधानमंडळाच्या डिजिटलायझेशन प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. M/s Deloitte या कंपनीच्या सल्लागारांना Detailed Project Report (DPR) मध्ये विधीमंडळातील सर्व कक्षांच्या साहित्यांची व कार्यप्रणालीची माहिती समाविष्ट करावयाची असल्याने त्यांना सर्व कक्षांना प्रत्यक्ष भेट देवून तेथील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी चर्चा करुन माहिती गोळा करावयाची आहे.

त्यानुषंगाने सर्व कक्षांना कळविण्यात येते की, संबंधित कक्षास डिजिटलायझेशन प्रकल्पामध्ये समावेश करावयाच्या त्यांच्या कक्षात असणारी माहिती, महत्त्वाच्या नस्त्या व संदर्भासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची सविस्तर माहिती तसेच डिजिटलायझेशनच्या माध्यमातून प्रत्येक कक्षाकडे कुठल्या प्रकारची माहिती कशाप्रकारे डिजिटल स्वरुपात मिळणे अपेक्षित आहे. याबाबतची सविस्तर माहिती M/s Deloitte या कंपनीच्या सल्लागारांना कक्षास भेट देतील त्यावेळेस देण्यात यावी.

**(जयवंत राणे)**
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

या सचिवालयातील सर्व कक्ष.

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) समितीतील संबंधित अधिकारी/कर्मचारी.
६) निवडनस्ती.